# प्रकरण चौथे

## सावलीचा वाङ्‌मयीन अभ्यास

## प्रास्ताविक

" सावली " ही आनंद पाटील यांची दुसरी लघुकादंबरी ही लघुकादंबरी १९८१ च्या मौज दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली आणि १९८६ साली पहिली लघुकादंबरी " कागूद " मिळून " कागूद " आणि सावली अशा एकत्रित स्वरूपात प्रकाशित झाली.

सावलीला सुद्धा रूढ अर्थाने कथानक नाही. " घर बांधताना येणा-या अडचणी" असे या कादंबरीचे कथानक एका वाक्यात सांगता येण्यासारखे आहे. आनंद पाटील यांच्या दोन्ही लघुकादंब-याचे कथा-गौनत्व हे वैशिष्टयमानावे लागेल, " कागूद " चा अभ्यास करताना व्यक्तिचित्रणावर आणि भाषाशैलीवर भर द्यावा लागतो. पण प्रस्तुत कादंबरीमध्ये रचनाकौशल्य आणि ग्रामीणजीवन दर्शन या अंगावर भर द्यावा लागतो.

" कागूद " मधील सर्व पात्रे धडपडी आणि वृत्तीने वेगळी असलेली दिसतात. सावलीमध्ये दोन्ही स्वरूपाची माणसे भेटतात. फसवणूक झालेली, गरीब स्वभावाची आणि फसवणारी उद्दाम स्वभावाची अशा परस्पर विरोधी स्वभावाची माणसे आढळतात.

घर बांधणा-या धोंडीबाला घर बांधून पूर्ण होईपर्यंत अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. वृत्तीने अतिशय चिवट असलेला धोंडीबा संघर्षाच्या परिस्थितीला तोंड देत राहतो. पण एवढे करूनही शेवटी त्याच्या पदरात दुःख पडते. अशा धोंडीबाचे व्यक्तीमत्व आपल्याला अभ्यासावयाचे आहे. याशिवाय धोंडीबाला मदत करणारा त्याचा दाजी तर खलपात्र म्हणून येणारा गणपागाडीवान यांच्याही स्वभावाचे आणि मानसिकतेचे आलेख पहावयाचे आहेत.

याशिवाय कादंबरीत वारंवार येणारा संघर्ष आणि त्यामधून घडत जाणारे ग्रामीण जीवनचित्रण याचा सविस्तर अभ्यास करु. आणि १९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीत प्रस्तुत कादंबरीने कोणती भर टाकली याचाही अभ्यास करु.

सावलीचे कथानक

" सावली " या लघुकादंबरीत लेखक आनंद पाटील यांनी ग्रामीण भागात घर बांधताना येणाऱ्या असंख्य अडचणींचे चित्रण केले आहे. ग्रामीण भागामध्ये स्वत:चे आणि तेही ऐस-पैस मोठ्ठे घर असणे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. त्यामुळे खेड्यात मोठ्ठी घरे बांधण्याची अहमहमिका लागल्याचे दिसते.

एखादा गावकरी घर बांधतो आहे म्हटल्यावर अनेकांना ही लाच खाण्याची संधीच असते. त्याच्या शत्रूंना विशेषत: गावकामगार पाटील, सरपंच, सेक्रेटरी, फॉरेस्ट ऑफिसर, कोतवाल,तलाठी, सावकार अशा लोकांना ही संधी असते. वरील सर्व लोक बिचाऱ्या घर बांधणाऱ्याला कसे लुबाडतात याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत येते.

या कादंबरीला मुंबईच्या गिरणी कामगारांच्या संपाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. गिरणी कामगारांनी संप पुकारल्यानंतरच्या कालावधीत काय केले असावे याचे काही अंशी उत्तर या कादंबरीत मिळते. कादंबरीचा नायक धोंडीबा आणि त्याचा भाऊ दामू हे दोघे गिरणीकामगार आहेत. त्याला आणखी दोन भाऊ आहेत. त्यापैकी एक सैन्यात भरती झालेला आहे तर दुसरा एकोंडवाडी या आपल्या गावात राहून शेतकी करणारा आहे.

धोंडीबा आणि त्याचे तीन भाऊ असे चौघेही आता मिळते झाल्यामुळे नुकतेच दाजीच्या मदतीने एकत्र कुटुंबातून विभक्त झालेले आहेत. साध्या

आणि लहान घरात राहणाऱ्या धोंडीबाच्या कुटुंबाला मोठ्या घराची आवश्यकता आहे. घरातील सर्व मिळवते झाल्यामुळे ते शक्यही आहे.

पण अचानक गिरणी कामगाराचा संप पुकारला जाऊन मुंबईतील सर्व गिरणीकामगारांची नोकरी जाते. त्यामध्ये या कादंबरीचा नायक धोंडीबा आणि त्याचा भाऊ दामू हे ही आहेत. बेकारीत मुंबईचा राहण्याचा खर्च भागत नसल्याने ते दोघेही गावी परततात. गावी आल्यावर धोंडीबाचा दाजी आणि धोंडीबा असा निर्णय घेतात की संप मिटेपर्यंत घर बांधून काढू. दाजी हा धोंडीबाच्या कुटुंबाचा " जावईपावना" असला तरी या जावईपावन्याचा धोंडीबाला खूप आधार आहे.

धोंडीबा आणि दाजीच्या घरबांधण्याला धोंडीबाच्या आईचा मात्र कडाडून विरोध आहे. कारण तिचा जीव तिच्या धाकट्या मुलात म्हणजे " दसरथात " अडकला आहे. त्याचे एकदा लगीन लावले की आपण मरायला रिकामे होऊ असे तिला वाटते. आपल्या माघारी दसरथाचं लग्न होईल की नाही याबद्दल तिला शंका आहे.

पण धोंडीबा आणि दाजीला वाटते की घर बांधून लग्न केले तर लग्नाच्या बाजारात " दसरताला" चांगला हुंडा मिळेल. म्हणून ते आईची कशीबशी समजूत घालतात. मुंबई सोडताना त्या दोघांनीही आपल्या नावावरील जमा पगाराची रक्कम आणली आहे. त्या बावीसशे रुपयांवर ते घर बांधण्याचे ठरवितात.

घर बांधताना कादंबरीचा नायक धोंडीबा याला अनेक विरोध आणि अडचणींना तोंड द्यावे लागते. घर बांधण्याला, घरातील आई आणि मावशी पासून ते भावकीतील गणपा गाडीवान यांचा विरोध असतो. गणपागाडीवानाला धोंडीबाचं घर होऊ नयेय असे दुष्टाव्याने वाटते. यासाठी तो अनेक कृष्णाकृत्ये करतो. धोंडीबाच्या सर्व कुटुंबाशी भांडण करतो. गाडीवाट मिळावी म्हणून पंचायत भरवायला लावतो. तलाठी

आणि फॉरेस्ट ऑफिसर यांना निनावी अर्ज करून धोंडीबाच्या बांधकामावर धाड पाडतो. या धाडीमुळे धोंडीबाचे खूप आर्थिक नुकसान होते. गणपाला धोंडीबाच्या नुकसानाने आनंद मिळतो, पण गणपाचा विरोध न जुमानता तो आपले घर पूर्ण करतो.

घराच्या बांधकामात एकटया धोंडीबालाच त्रास सोसावा लागतो असे नाही तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाला त्रास सहन करावा लागतो. धोंडीबाचा तीसरा भाऊ नामा मिलवट्टीवाल्याचाही घराला विरोध आहे. आपल्या भावांचे घर बांधणे म्हणजे सरपंच, तलाठ्यांची भर करणे आहे असे त्याला वाटते. चांगली नोकरी असणाऱ्या भावाचे सहकार्य नसल्यामुळे धोंडीबाला क्षणभर नाउमेद झाल्यासारखे होते पण क्षणभरच.घरासाठीचा संघर्ष एवढयावर थांबत नाही.

पावसाळ्या अगोदर घर बांधून पूर्ण होते. पण पाऊस दडी मारतो, दुष्काळ पडतो आणि धोंडीबाच्या सगळ्या कुटुंबाला दुष्काळाला तोंड द्यावे लागते. येणाऱ्या सुगीत आपण मोतीलाल शेठच्या कर्जाचे व्याज भागवू शकू असा धोंडीबाला विश्वास वाटत असतो तो ढासळतो. पोट भागवण्यासाठी दुष्काळी कामावर रोजगाराने जावून धोंडीबा, त्याची बायको तानू आणि दसरता यांना उन्हात यावे लागते. दुष्काळी मजूरी सुध्दा अपूरीच पडते. भाकरीच्या पिठात कोंडा मिसळून केलेल्या भाकरी खाव्या लागतात. म्हणून धोंडीबा इचलकरंजीला जावून नोकरी करण्याचे ठरवतो.

इचलकरंजीत जावून धोंडीबा तीन महिने काम करतो पण पदरात सहाशे रूपयेच पडतात. म्हणून इचलकरंजी सोडून तो पुन्हा गावाला परत येतो. कर्ज फेडण्याचा मोठा प्रश्न त्याच्या समोर असतो म्हणून तो जमिनीचा एक तुकडा विकण्याचे ठरवतो.

आपलं एक घर असाव या सर्वसामान्य इच्छेची पूर्तता करताना धोंडीबाच्या घराला जे कष्ट सहन करावे लागतात त्याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत येते·

अत्यंत वास्तववादी पध्दतीने लेखक आनंद पाटील यांनी घर बांधणा-या एका कुटुंबाचे चित्रण केलेले आहे· पाया खणून घर थराथरांनी वर चढत जाते· पण सहजा-सहजी नाही· त्यामध्ये अनेक अडथळे येतात· या अडथळ्यातून सामाजिक वृत्ती प्रवृत्तीचे दर्शन घडते· सरकारी अधिका-यांची लाच खाण्याची वृत्ती, सरपंच पाटलांचा दादागिरीचा कारभार, जंगलातील लाकडाची चोरी, देवीला कौल लावणे, दारुड्या नव-याकडून होणारा स्त्रीचा छळ, कुटुंबातील कलह, ग्रामीण वस्तुविनिमय पध्दती, पावणेर पध्दती, अशा अनेक स्वरूपाच्या सामाजिक जीवनाचे दर्शन या कादंबरीत पदोपदी घडते· कादंबरीचा शेवट शोकात्म होतो· पण केवळ कलात्मक परिणामकारकतेसाठी लेखकाने ही शोकांतिका केलेली नसून तो वास्तवाचाच एक भाग ठरतो·

## व्यक्तिचित्रण

### धोंडीबा

धोंडीबा हा " सावली " या लघुकादंबरीचा नायक आहे· मुंबईत गिरणी कामगार म्हणून काम करणारा धोंडीबा गिरणी कामगारांनी संप पुकारल्यामुळे आपल्या गावी-एकोड्वाडीला परतलेला· त्याच्या बरोबर त्याचा सगळा लहान भाऊ दामूही आहे· सतत कामात राहण्याची सवय असलेल्या धोंडीबाला संपाच्या काळात काही तरी करावे असे वाटते· त्याचा पिंड स्वस्थ बसणा-या पैकी नाही· मुंबहून आल्या बरोबर दुस-या दिवशी तो आपल्या सर्वात लहान असलेल्या भावाला -दसरताला म्हणतो·

" बोला कारभारी· काम सांगा आमाला, आज फिरु गावं खरं उद्याच काय ?"[१] दसरता म्हणातो दादा एक दोन दिवस विश्रांती घ्या

पण धोंडीबाला विश्रांती घेणे माहित नाही. कामात बदल हीच विश्रांती हे त्याचे तत्त्व आहे. तो म्हणतो." भले कारभारी, उद्या पावसाळ्यात भोकरवाड्याच्या पानलोटात शेतात माती -हाईल का ? चला मी लावतो तुमाला कामाला"[२]

आपल्या भोळसट वडीलांना त्यांच्या आयुष्यात चांगल घर बांधायला जमलं नाही. आयुष्यभर कष्ट उपसले पण भावाने म्हेपानांनी पैसा दाबून ठेवला आणि धोंडीबाचा आबा कंगालच राहिला. हे दुःख त्याला टोचत आहे. म्हणून आपण घर बांधून दाखवायचे ही जिद्द त्याच्या मनात आहे. शिवाय सैन्याच्या सुट्टीत काय करायचे हा ही प्रश्न त्याला भेडसावत होता. म्हणून तो घर बांधण्याचा निर्णय घेतो.

धोंडीबाचे घर एकत्र कुटुंब पध्दतीने राहणारे आहे. त्याच्या घरात त्याची आई, तीन भाऊ, दोन भावजया, बायको, आणि मुले इतके लोक आहेत. पैकी तिसरा भाऊ सैन्यात भरती झालेला आहे. थोरला धोंडीबा हा कुटुंबप्रमुख आहे. पण धोंडीबा मुंबईला गेल्यापासून लहान भाऊ दसरथाकडे घराची जबाबदारी येते. दसरताला सगळे यासाठीच कारभारी म्हणतात. स्वतः मोठा असूनही धोंडीबा आपल्या लहान भावाला मोठापणा देतो.

कुटुंबप्रमुखाकडे जी थोरवृत्ती असावी लागते ती धोंडीबाजवळ आहे. म्हणूनच कुटुंबामध्ये आणि गावामध्ये त्याला मान आहे. गावातील काही चांगली आणि बुजुर्ग माणसे त्याला मानतात. तो हलक्या कानाचा नाही. स्त्रीसुलभ स्वभावाप्रमाणे त्याची बायको " तानू " घरच्या कटकटी त्याला सांगते. पण त्या ऐकून न घेता तो तिलाच ठणकावतो. तानू सांगते यावर्षी घर बांधायचे पुढे ढकला, मिलक्ट्रीवाल्याच्या बायकोने पत्रावरचा राग आपल्या मुलावर काढल्याचे ही ती सांगते. पण धोंडीबा तिलाच ठनकावतो, " जावाजावांची कवच मला खपणार नाही.... आगं आत्ताच सुरु झाली तुजी ट्रॅक्टर, उद्या घराचं काम सुरु झाल्यावर काय दिवं लावशीला भना, समद्या पांढ-या पायाच्याच, आलीया गुरमीतर सांगाय मला"[३]

धोंडीबा जसा रागीट आहे, तसाच प्रेमळ आणि समजावून सांगणारा आहे. रागावून शांत झाल्यावर धोंडीबा तानूला म्हणतो, " आगं माजं बोलनं मनावर घीत जावू नगं अशा टायमाला. तुला हजारदा सांगिटल्या बायकोच्या कचकचीनं घराचा आब जातो. तू मानाची थोरली कारबारीन"४

धोंडीबाच्या थोरल्या बहिणीचा नवरा दत्तू एकनाथ पाटील उर्फ दाजी हा धोंडीबाचा जवळचा मित्र वाटतो. त्याचे आणि दाजीचे विचार जुळतात. जसे धोंडीबाला घर बांधावे वाटते. तसे किंबहुना त्याहूनही अधिक दाजीला वाटते की दाजी धोंडीबाच्या घरासाठी सर्वप्रकारची मदत करावयास तयार आहे. याचा धोंडीबाला खूप आधार वाटतो. अशी तना-मनानं मदत करणारी खूप माणासे दाजीबाने जोडलेली आहेत. अडचणीच्या प्रसंगी माणसाला मदत केली की कोणताही माणूस ते उपकार विसरत नाही. धोंडीबाने अशीच मदत दाजीला केलीहोती. एकदा दाजी बैल खरेदी करण्यासाठी गोरगावच्या बाजाराला गेला असताना त्याचा हजार-बाराशे रुपयांचा खिसा कोणीतरी मारला. त्यामुळे दाजीचे अवसान्च गळून गेले. यावेळी धोंडीबाने आपल्याला हौसेने केलेली अंगठी गहाण ठेवून दिवसाच्या बोलीवर बाराशे रुपये उसने घेतले. उसने पैसे देणारा सुद्दा धोंडीबासाठी भला माणूस होतो. कारण त्याने धोंडीबाची अंगठी न घेताच पैसे दिले. प्रसंगी तोंडचा घास दुसऱ्याला देवून त्याने माणासे जोडलेली आहेत. म्हणून तो म्हणतो, " मान्स जोडाय लई सोसाय लागतं. मनात साटबपईचं असत"५

घराचा कर्ता असलेला जिवाभाचे मित्र जोडणारा, कष्टाळू धोंडीबा हा अतिशय संवेदनशील पुढच्या संभाव्य धोक्यांची चाहूल घेणारा. म्हणजे " " हारणाकाळजीचा आहे" तो सतत कशाची ना कशाची काळजी करत असलेला दिसतो. अशा त्यांच्या स्वभावामुळे त्याची तब्येत अत्यंत कीरकोळ आहे. त्याच्या स्वभाव आणि तब्येती बद्दलचे वर्णन पहा.- " उनानं काळी पडल्याली काटकुळी बांडी बघून तो स्वत:लाच हसला. त्याला खाणावळीचं खाणं मुंबईला मानवत नव्हतं. गावी आल्यावर खाल्यालं............

पचत नव्हंत. आता घराच्या कामात कसा निबाव लागायचा ही काळजी त्याच्या मनात घर कराय लागली. वयाची चाळीशी गेल्या साली सुरु झाली, मिलच्या डाक्टरनं त्याला काळजी घ्यायला सांगितली होती".[8]

भांडणे करण्याची त्याला हैास नाही. मानहाणी स्वीकारुन भांडणे टाळण्याकडे त्याचा कल आहे. चिडलेल्या भावाना तो आवरतो भांडणापासून लांब ठेवतो. घराच्या जागेच्या सातबारावरुन जेव्हा तलाठी-कोतवाल धोंडीबाला लुबाडतो तेव्हा धोंडीबाचा भाऊ दामू याला, गणपानेच तलाठी-कोतवालाला निनावी अर्ज करुन आपल्यावर संकट टाकले असणार असा संशय येतो. म्हणून तो रागाने म्हणतो, कुनी निनावी अर्ज केलाय त्येंच नाव नुस्तं फुटाय पायजे गा, त्येच्या मी..... दामूच्या अशा बोलण्यावर धोंडीबा त्याला काळजीच्या सुरात सांगतो, " दामू घरात तिरपासलास त्येवडा बास, हंब-याच्या भाईर दारुबिरु पिवून कुनाच्या नावानं बराळशील. घराच्या कामात खोडा घालश्य लईजनं टपल्यांत".[7] यावरुन धोंडीबा अनेक शक्याशक्यतांवर विचार करणारा संवेदनशील असल्याचे स्पष्ट होते.

दसरथांचे लग्न बाजूला ठेवून घर बांधणे धोंडीबाच्या आईला पसंत नाही आणि पैशाच्या व्यवहाराला घाबरणारी म्हातारी आपल्या पैशाच्या उलाढालीच्या गप्पा ऐकूण घाबरते याची धोंडीबाला जाणीव आहे म्हणून तो दाजीला सांगतो, " लागतील त्येवडं घाला पावनेर दाजी, खरं खर्चाचं आकडं आईकून आईला धडकी भरतीय बगा.हितनं म्होरं आपून क्वा घराची चर्चा तिच्यापुढं काडाईची न्हाई".[6] आख्ख्या कादंबरीत तो काळजी करताना दिसतो. कोल्हापूरमधील शाहू मिलच्या कामगारांनी मुंबईच्या संपाला पाठींबा दिला आणि त्या प्रीत्यर्थ गिरणी बंद ठेवून मोर्चा काढण्यात आला.या मोर्चामध्ये धोंडीबा बलराम मुंबकराच्या आग्रहास्तव सामील होतो. एक दिवस तो संपासाठी देतो.पण त्या दिवसभर त्याचे लक्ष मोर्चात नसून गावाकडील घरावरच घारीसारखे फिरत राहते, मोर्चामध्ये तो चालत असतो पण घोषणांकडे त्याचे लक्ष नसते.

त्याच्या घोषणा शेजारच्या माणसालासुद्दा ऐकू येत नाहीत. इतकी तो काळजी करतो. त्याचा काळजी करणारा स्वभाव दाजीला माहित आहे. तो एकदा म्हणतो ही " तू किती हारनकाळजी रं.धोंडीबा, सा-या कडातनं डोकऱ्यागत निसटत आलायस, आता नुस्तं शेपूट आडाकल्या वास्तुकात, डॉक्टरबी तुजा कडीलपणा बगून चॅट पडलाय, मलाबी न्हवतं वाटत, तू येवडा त्यारीचा असशील, जरा काळजी कमी कर"[९]

धोंडीबा जसा " हारनकाळजीचा" आहे तसाच तो चिकाटीचा सुद्दा आहे केवळ काळजी करत बसणारा निष्क्रीय नाही. हाती घेतलेले काम कोणत्याही परिस्थितीत पार पाडायचे हा त्याचा हट्ट आहे. मग शरीर जरी साथ देत नसले तरी त्या शरीराला तो आजारी पडण्याची मुभा देत नाही. कामाच्या आणि विचारांच्या ताणाने धोंडीबाचे शरीर हळूहळू थकत चालले आहे. त्याच्याआत आताशा बारीक कनूकनू आहे. पण तरीही तो काम करत राहतो, आपल्या शरीराची तक्रार तो सहजासहजी कोणाला सांगत नाही. घर उभे करण्यासाठी पडेल ते कष्ट सोसायला तो तयार आहे. घरासाठी धोंडीबाने उपसलेल्या कष्टाबद्दल निवेदकाचे वर्णन पहा: " कोल्हापूराहून परत निघालेल्या गाड्या नाग-फणीच्या उताराला लागाय दिवस माथ्यावर आला, तीन दिवसांच्या धाव पळीनं धोंडीबाला अंगात कणाकणी भरल्यागत झालं होतं. रातबर बैलांच्या शेपट्या मोडून जीव आयरणिटीला आला होता. शिळपाकं खाल्ल्यालं जागरणामुळं पचलं नव्हतं हाऊघात हाडं सैल झाली होती, पापण्या झाकाय लागल्या होत्या सावळ्याच्या गाडीचा मुगा धरून त्याची बैलं कशीबशी ढकलत जात होती"[१०] वरील उताऱ्यातून धोंडीबाच्या कष्टाची कल्पना येते.

अशा बेसुमार कष्टामुळे आणि अंगावर काढलेल्या आजारामुळे तो आतल्याआत आजाराने अशक्त होत जातो. पुढे त्याला दहा दिवस सरकारी दवाखान्यात अॅडमिट व्हावे लागते. घराचा ताण असलेला

धोंडीबा तापात बरळू लागतो. त्याला विचित्र स्वप्ने पडू लागतात. एवढी परिस्थिती येईपर्यंत अव्याहतपणे तो कष्ट करत राहतो. आपण आजारी पडत निघालो आहोत याची त्याला पूर्ण जाणीव आहे.पण हे तो कोणाला सांगत नाही,जेव्हा जाबर त्याला तुझा घसा का घवघवतो म्हणून विचारतो तेव्हा तो उडते वरवरचे उत्तर देतो, " थंडी-ताप नि सर्दीनं पिडल्या बगा, त्या लग्नातल्या जेवनाबरनं"११

घर कौलांनी झाकून निघाल्यानंतर त्याची मनशक्ती संपते आणि तो अंथरुन धरतो. मोडके डॉक्टरांच्या औषधाची त्याला रिॲक्शन येते. त्यामुळे त्याला दहा दिवस ॲडमिट व्हावे लागते.

घर बांधण्याची इच्छा मनी बाळगून असणारा धोंडीबा आपले घर बांधून पूर्ण करतो मात्र तेथूनच त्याच्या शोकांतिकेला सुरुवात होते. घरासाठी ज्या आधारावर तो सावकाराकडून कर्ज घेतो, तो आधारच कोसळतो, येणाऱ्या " सुगीत" धान्याच्या आधारावर त्याला कर्जाचा हप्ता फेडता येणार असतो पण दुष्काळ पडतो, त्याची नामुष्की होते, त्याला, त्याच्या बायकोला आणि दसरताला दुष्काळी कामावर जावे लागते. या वाताहतीमुळे त्याला उगीचच मनातून वाटत राहते की आपणच या सर्वाला कारणीभूत आहोत, आपण सगळ्या घराची हाडे झिजवली घराच्या नादात पोराबाळांचे हाल केले.

दुष्काळी कामावर मिळकत होत नाही म्हणून तो नोकरीसाठी इचलकरंजीला जातो. तिथेही त्याला अमाप कष्ट करावे लागतात, ते कष्टही तो उपसतो पण माघार घेत नाही.

असा हा नायक " धोंडीबा" सुरुवातीपासून शेवटपर्यंत कष्ट करत असलेला दिसतो. कर्ज काढून पैसा खर्च करून तो घर बांधतो. पण घराचं सुख त्याला मिळत नाही. कर्ज फेडण्यासाठी त्याला रस्त्यावर यावे लागते, धोंडीबाच्या इचलकरंजीतल्या एका सहकाऱ्याचे त्याच्या बद्दलचे उद्गार विचारात घेण्यासारखे आहेत.तो म्हणतो, " बगा ए धोंडदा घराची सावली करूनबी उनातच आलाय, ये है जिंदगी यार"१२

असा हा धोंडीबा ग्रामीण कष्टकरी शेतकऱ्याचा प्रतिनिधी ठरतो, शेतीवर पोट भागत नाही म्हणून तो मुंबईस जातो आणि तेथील संपामुळे तो पुन्हा गावी येवून जे कष्ट करतो. त्यावरून भारतीय खेड्यातील एका खेडूताचे जीवन चित्र डोळ्यासमोर उभे राहते.

दाजी
----

" सावली " या आनंद पाटील यांच्या लघुकादंबरीचा धोंडीबा हा नायक आहे तर " दाजी " हे पात्र प्रमुख दुय्यम पात्र आहे. दाजी उर्फ दानोळीकर जावई दत्तू एकनाथ पाटील हा धोंडीबाच्या थोरल्या बहिणीचा नवरा म्हणजे त्याचा दाजी आहे. त्याचे गाव दानोळी असले तरी आपल्या घरापेक्षा त्याचे आपल्या सासरवाडीकडेच जास्त लक्ष आहे. सासरवाडी, त्याचा मेव्हाणा त्याला मान देतो त्याचा सल्ला घेतल्याशिवाय त्याच्या मेव्हण्याचे पान हालत नाही. नायक धोंडीबा आणि दाजी यांचा एकमेकावर खूप लोभ आहे. ते एकमेकांच्या शब्दाला मान देतात.

धोंडीबाने घर बांधून दाखवावे असे दाजीला खूप वाटते, कारण गणापागाडीवान धोंडीबाला, " धोंड्यानं दगाड फोडून केलं काय ? तर वड्यात गळगा रचला, मला वाटलं, वाडा बादंल्यात बुळगी"[१३] असे म्हणून हिणावत असतो हे हिणावणे दाजीला धोंडीबावरील प्रेमामुळे सहन होत नाही, उद्दाम गणापागाडीवानाला आपल्या मेहुण्यांनी घर बांधूनच दाखवावे असे त्याला वाटते, यासाठी सर्व प्रकारची मदत करण्याची त्याची तयारी आहे.

मुंबईतील गिरणी कामगारांनी संप पुकारल्यामुळे लवकरच आपले थोरले दोन मेव्हणे घरी परतत आहेत, हे पाहून तो आपल्या धाकट्या मेव्हण्याजवळ घराचा विचार काढतो," काय कारभारी आता नवं घर बांधायला काडा धोंडीराम आनू दामू दोन चार महिने -हाणार हितं-तुमाला त्यांची मदत हुईल"[१४]

काहीही करून त्याला मेव्हण्यांना घर बांधण्यास उद्युक्त करायचे आहे· प्रत्यक्ष थोरले मेव्हणे आल्यावर त्यांना तो म्हणतो, " बायला येकबार घर बांधून दावाच गनप्याला,दसरतानं सांगिटलं न्हवं समदं कीर्तनं तुम्ही काय मेल्याल्या आईच दूद प्यालाय ? गाडीवानानं किच्चं हिनवावं तुमास्नी का, मी म्हंतोय त्ये खोट हाय ?"[१५] पण धोंडीबाला मात्र पैशावीना दाजीबाचे म्हणणे पटत नाही· त्याला खर्चाचा मोठा आकडा दिसत राहतो· धोंडीबाच्या या थंडपणामुळे दाजीबा चिडतो, " मुंबेवाल तुमी आदीच घर टाकून बसू नगा हरीनाना गवंड्यान टिपनच केल परवा दिशी मोरगावच्या बाजारात आठनऊ हजारात अठरावीस खनी घर झोकात निगतंया गणपा गाडीवान कसलं बोलनं करतुया इच्चारा कारबा-याला"[१६]

हा हट्ट आणि आग्रह दाजी आस्थे पोटी करतो· सासरवाडीची गरीब गायीसारखी माणसं अगोदर गणपा गाडीवानाच्या घरातच अन्याय सहन करत राहत होती· हे न सहन होवून दाजीनेच पुढाकार घेवून आपली सासरवाडी गणपाच्या कुटूंबातन बाजूला काढून घेतली आहे· आता स्वतंत्र राहिलेल्या आपल्या मेव्हण्यांनी मोठं घर बांधावे आणि गणपा गाडीवानाचे नाक कापावे असे त्याला वाटते ·

गणपागाडीवानाला मात्र दाजी दानोळीकरचा धोंडीबाच्या घरातील पुढारीपणा आणि पाठींबा पाहवत नाही· दाजीचा आधार असल्यामुळे गणपा दसरताच्या घराला काही करु शकत नाही· कारण संपूर्ण एकोंड्वाडी दानोळीकरांना घाबरून असायची· पूर्वी दानोळीची माणसं वाटमारी करायची म्हणून त्या भागात अशी म्हणच पडली आहे, कामानं कन्हती शिनोळी आणि आयतं गिळती दानोळी·

धोंडीबाच्या आईला दाजीचे घरचे पुढारीपण मान्य नाही म्हणून ती रागाने म्हणते, " दानुळीकराच्या नादानं धाकला पुंड बिगाडलाय"[१७]

या शिवाय धोंडीबाच्या मावशीलाही दानोळीकराचे बहिणीच्या घरातील लुडबुडणं पसंत नाही· तीला असे वाटते की, दाजी तोंड पाटील की करीत भनीच्या पोरांना आज ना उदया पाण्यात घालणार नामा मिलट्रीवाला सुध्दा दाजीवर चिडून आहे· तो पत्रातून आपल्या भावांना स्पष्ट कळवतो, दाजीच्या तालावर नाचणं मला बिल्कुल पसंद नाही· पुढे मिलट्रीवाला तार आल्यामुळे घरी परतला तेव्हा तो दाजीवर उखडतो म्हणतो, " रजा खाली दस दिन भेटली, भावजी पन तारा कराय काय आक्कलभेजा हाय का न्हाय तुमास्नी"[१८]

दाजीवर एवढया लोकांचा रोष असला तरी तो धोंडीबा वरील प्रेमाखातर सर्व सहन करतो, कारण धोंडीबाला फक्त त्याचाच आधार आहे· म्हेवण्याचे घर बांधायचे म्हटल्यावर तो लगेच एक चांगले नडीला आलेल्या रोख पैशाच्या गि-हाईकाला आपला बैल विकतो आणि त्याचे साडेसतराशे रुपये धोंडीबाच्या हातावर ठेवतो·

आर्थिक मदत, मानसिक आधार याबरोबर दाजी धोंडीबाचा चांगला मित्र असल्यामुळे काही जीवाभावाची चर्चाही तो धोंडीबाशी करतो· अशा संबंधामुळे धोंडीबा त्याच्या आधाराने निर्णय घेतो, नामा धोंडीबाला घर बांधण्यासाठी मदत करत नाही हे पाहून दाजी धोंडीबाला म्हणतो, " तुज वागनंच नडतंया धोंडीबा, भावास्नी तू सैल सोडलंस , आता खांद्यावर बसून कानात मुताय लागलं"[१९] धोंडीबानं भावांना सैल सोडायला नको होतं असा खाजगी सल्ला तो देतो·

घरासाठी पैसा कसा-कसा आणि कुठून जमा करायचा हे सुध्दा दाजीच सांगतो, " मुंबिवालं, उद्या गेल्याबरोबर पावन्याच्याकड वसुलीला धाडा मान्सं, परत्येक पावन्याकडनं हाटून शेपाचशे वर्गनी गोळा कराय पायजे बगा··········माजा पुतन्या येणार हाय बग सुट्टीला चार आट दिसात त्येच्याकड सबूद टाकून बगा· शिनुलीत मानिकशेटलाबी आत्ताच बोलून ठेवा·त्येच बाज न्हाय परवडायचं, पर आमचा मास्तर वाट काढील काय तरी "[२०]

मिलीट्रीवाला नामा घराच्या वादातून रुसून आपल्या सासरवाडीकडे निघुन जातो. पण त्याची बायको मात्र पाचशे रुपये माहेराहून घेवून येणार असते. तेव्हा दाजी सल्ला देतो, " जग दुतोंडी सावज असत, दामू मिलक्ट्रीवाला गेला रुसून तरी तुजी वैनी येणार हाय आज पाचशे रुपये घेवून म्हायारास्नं- धोंडीबा तिला दुक्वाईची न्हाई." २१

असा हा दाजी एक दिवस घरी आला नाही तर धोंडीबाला चुकल्या सारखे वाटते. तो त्याची वाट पहात राहतो. प्रस्तुत लघुकादंबरीतील दाजी हे प्रमुख दुय्यम पात्र आहे. कारण घर बांधण्यासाठी धोंडीबाच्या खालोखाल त्याचीच धडपड उठून दिसते.

या दाजीच्या घरची परिस्थिती सधन आहे, अशातीलही भाग नाही. त्याची आर्थिक परिस्थिती जेमतेमच आहे. बैल विकून धोंडीबाला तो मदत करतो. म्हणजे पैसे हवे असल्यास त्याला काहीतरी विकणे हाच मार्ग आहे. यावरुन त्याची आर्थिक परिस्थिती लक्षात येते,याशिवाय दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे दाजीला सलग पाच पोरीच झालेल्या आहेत. त्याच्या लग्नाची तजवीज हा मोठा प्रश्न त्याच्यासमोर आहे. पण म्हणून तो काळजी करत नाही. आपल्या घराच्या नादात दाजीच्या पोरींचे नुकसान नको म्हणून दामू दाजीला बजावतो, आमच्या घराच्या नादात पोरींची शाळा बुडवशील यावर दाजी गमतीने म्हणतो, " त्या न्हाईतर वकिली कराय जायाच्या चार मामं आमच्या चार पोरींचं धडभलं बगतील मला न्हाय ती काळजी" २२

धोंडीबा इचलकरंजीला कामासाठी गेल्यावर हा दाजी धोंडीबाला गावाकडील परिस्थितीची माहिती देणारे पत्र टाकतो. अशाप्रकारे या कादंबरीत येणारी दाजी ही धोंडीबाच्या कुटुंबाला सर्वतोपरी मदत करणारी सहकारी वृत्तीची व्यक्ती आहे.

गणपागाडीवान

" सावली " या कादंबरीमध्ये गणपा गाडीवान हे पात्र खलपात्र म्हणून येते. नायक धोंडीबा घर बांधायला काढतो हे त्याला स्वत नाही. खरे पाहता खलपात्र गणपागाडीवान हा धोंडीबाचा चुलत भाऊ लागतो. अगोदर दोघेही एकाच घरात रहात होते. आता ते विभक्त झाले आहेत. तत्पूर्वी गणपाने गोड बोलून धोंडीबाच्या कुटुंबाची मदत घेवून आपले घर बांधून घेतले आहे, आणि काम झाल्यानंतर त्याच्याशी वैर धरले आहे. मनातून त्याला वाटते. आपण आपले घर बांधले तसे धोंडीबाने बांधू नये. आपली बरोबरी धोंडीबाने करु नये.

फक्त गणपाला असे वाटते असे नाही तर गणपाचे सर्व कुटुंब कादंबरीत खलपात्र म्हणून येते. गणपा सगळ्यांच्या पुढे आहे. इतकेच गणपा गाडीवान संपत्तीकडून गब्बर आहे. ही कमावलेली संपत्ती त्यांच्या वडिलांनी धोंडीबाच्या वडिलांना फसवूनच कमावलेली आहे. धोंडीबाच्या भोळसट आबांना म्हैपानाने म्हणजे गणपाच्या आबाने जन्मभर राबायला लावले आणि सगळा पैसा आपल्याकडे ठेवला. म्हणजे गणपाची खलवृत्ती त्याच्या आबापासून परंपरेने चालत आलेली आहे, तर धोंडीबाची भोळसट स्वभाव त्याच्या वडिलांपासून अनुवांशिकतेने आलेला आहे.

भोळसट स्वभावामुळे धोंडीबा अजूनही आपल्या घराची प्रगती करु शकलेला नाही. याउलट गणपाने मात्र लांड्या लबाड्या करुन भरपूर संपत्ती मिळवली आहे. या संपत्तीच्या जीवावर तो आता उद्दाम झाला आहे. धोंडीबाला तो हिनवतो, म्हणतो, " धोड्यानं दगाड फोडून केलं काय ? तर वड्यात गड्गा रचला. मला वाटलं वाडा बांदत्यात बळगी"[२१]

गणपागाडीवानानं समाईकातील झाड कापून आणून, दुमजली घर चारवर्षापूर्वी बांधून काढले आहे. धोंडीबाची सगळी माणसं त्यानं

त्यासाठी राबवून घेतली आणि आता तो त्याच्याच विरोधात गावात धोंडीबाचं घर दसरताचं लग्न झाल्यावर फुटणार असा डंका वाजवत सुटतो. म्हणजे त्याला धोंडीबाचे घर एकत्र आहे हे पहावत नाही. ते घर फोडण्यासाठी त्याचा प्रयत्न सुरु आहे.

धोंडीबाचे घर होऊ नये यासाठी तो अनेक अडथळे निर्माण करतो, धोंडीबा घरासाठी पाया खणताना त्याच्या जागेतून आपल्याला गाडीवाट पाहिजे म्हणून अडथळा आणतो. गाडीवानाच्या घरच्या साळ्या बायका घराच्या पायाला आडवे लावतात. त्यामुळे धोंडीबाला " पंचायत" बोलवावी लागते, त्यासाठी त्याची खूप पायपीट होते, सरपंचाला लाच द्यावी लागते. पण धोंडीबाचे नुकसान हेच आपले समाधान असे गणपागाडीवानाचे धोरण आहे. शेवटी तो गाडीवाट मिळवतोच.

घरासाठी लाकूड, फळी पाहिजे म्हणून धोंडीबा आपल्या शेतातील चार झाडे तोडतो पण यामध्येही गणपा धोंडीबाला अडचणीत आणतो, फारेस्ट ऑफिसात निनावी अर्ज करुन धोंडीबाच्या बांधकामावर धाड पकडतो. फारेस्टर, रेंजर धोंडीबाला आधी पाच झाडं जगवून दाखवल्यावर एक झाड तोडण्याचा पास मिळतो. हा नियम दाखवून त्याच्याकडून हजार रुपयांची लाच उकळतो. या धाडीमुळे भोळसट धोंडीबा घाबरुन जातो. तो देवाचा धावा करतो. गणपाचा डावही तो ओळखतो, " गणपानं दुसरा फासका टाकलाय, हयो फास सरपंचालाबी न्हाय निगला तर ! देवा भैरुबा कसली साडेसाती म्हनाईची ही".[२४]

तो तलाठी कोतवालाला सरकारी रानात घर बांधतात म्हणून निनावी अर्ज पाठवतो. त्यामुळे तलाठी कोतवालाची धाड धोंडीबाच्या बांधकामावर पडते. तलाठी कोतवालाची पाय धोंडीबाला धरावे लागतात. आणि पाचशे रुपयांची लाच चारुन कोंबडीचे जेवन दयावे लागते.

अशा प्रकारच्या अडचणी आणून तो धोंडीबाचे घर होऊ न देण्याचा प्रयत्न करतो. पण धोंडीबा आपले घर पूर्ण करतोच.

ग्रामीण भागात ज्याला भावकी म्हणतात ती भावकी धोंडीबा आणि गणपा गाडीवानाच्या घराच्या निमित्ताने या कादंबरीत चित्रित होते. सगळे गाव आपल्यापुढे गेले तरी चालेल पण आपल्या भाऊ बंदानी मात्र आपल्या पुढे म्हणजे आपल्यापेक्षा जास्त विकास करता कामा नये अशा प्रकारचा हेका या भाऊबंदकीत असलेला दिसतो.

गणपाच्या अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर सदरहू कादंबरीतील संघर्ष उठून दिसतो. कादंबरीच्या उत्तरार्धात जरी नायक विरुद्ध परिस्थिती असा संघर्ष येतो. त्यामुळे गणपाचे कादंबरीतील स्थान अपरिहार्य ठरते.

## सावली मधून होणारे ग्रामीण जीवनदर्शन

" सावली " ही लघुकादंबरी अस्सल ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवते. प्रस्तुत कादंबरीचा विषय घर बांधणे हा आहे. हे घर बांधत असताना वस्तुविनिमयावर आधारलेल्या ग्रामसंस्थेत घर बांधणा-याना जवळ-जवळ संपूर्ण गावाशी संधान बांधावे लागते. या मध्ये पाटील, सरपंच, तलाठी, कोतवाल, भाऊबंद, नातलग, पाहुणे या सर्वांशी घर बांधणा-याचा संबंध येतो.

या कादंबरीतील नायक धोंडीबाचे कुटुंब ग्रामव्यवस्थेचे घटक आहे. या कुटुंबाच्या घर बांधण्याच्या कहाणीत ग्रामीण जीवनाचे अनेक संदर्भ येतात. धोंडीबा आणि दामू हे दोघे भाऊ-भाऊ मुंबईहून परततात तेव्हा ते मावशी, बहीण यांना मुंबईचा खाऊ वाटत येतात. मुंबईहून येणा-या प्रत्येकाने मुंबईची मिठाई आणायची ही ग्रामीण भागातील रीत येथे दिसून येते.

ग्रामीण भागातील पोस्टाचा कारभार हा चोख नसतो. तेथील पोस्टमन प्रत्यक्ष गावास जाण्याचे टाळतो. शक्यतो तो एखादया ओळखीच्या मानसाकडून चिल्लर गावांचे टपाल पाठवून आपली पायपीट वाचवतो. एक दिवस, मुंबईहून नुकतेच परतलेले धोंडीबा दामू यांच्याकडे पोस्टमन पोस्ट देतो, " ट्रिंग ट्रिंग ट्रिंङ्ग सायकलीची घंटी वाजवीत शिनोली पोस्टाचा रनर आडवा आला. खोताची वाडी नि एकाडवाडीच्या पत्रांची पुडकी गाडीत फेकीत तो म्हणाला, " मुंबैवाला, आमचं येवडं काम हलकं करा "[२५]

सरकारने ग्रामीण भागातील जंगलांची राखन करण्यासाठी जरी फॉरीस्टर नेमले असले तरी. जंगलतोड होऊन लाकडांची चोरी व्हायची तशी होतेच. याला कारणे अनेक आहेत. ती म्हणजे फारेस्टरचा कामचुकारपणा, लाचखाऊपणा आणि ग्रामस्थांचे चोरीचे कौशल्य. या कादंबरीत सरकारी जंगलातील लाकडाच्या चोरीचा उल्लेख दोन ते तीन ठिकाणी येतो, "दाजीला दरवर्षी चोरीच्या जंगली जळाव् लाकडांची गाडी घाया लागायची. दसरता आपल्या खपापुरत्या दोन गाड्या संधी साधून डोंगरातन भरून आणायचा."[२६] पुढे कारण नसताना धोंडीबाच्या बांधकामावर पडलेली फॉरेस्टरची धाड आणि त्याचे एक हजार रुपयांना लुबाडणे या प्रकाराला चिडून धोंडीबा दोन अडीच हजाराचे सागवानी लाकूड चोरतो.

भ्रष्टाचार ही फक्त शहरांची मक्तेदारी नाही, ग्रामीण भागात सुद्धा शक्य तेवढा भ्रष्टाचार चालतो. या भ्रष्टाचाराचा फटका कादंबरीचा नायक धोंडीबा याला वारंवार बसतो. घर बांधण्याच्या परवानगीसाठी सरपंचाला लाच द्यावी लागते. गणपागाडीवानाच्या निनावी अर्जामुळे धोंडीबाच्या बांधकामावर तलाठी कोतवालाची धाड पडते. तेव्हाही त्याला पाचशे रुपयांची लाच द्यावी लागते, " तुमचं म्हनून हया भानगडीत पडतुया हा मी, मुंबैवाला, कोंबडीबिबडी

ग्रसकाय सांगा. नोटा गुपचुप तलाठ्याच्या मुठत घाला.मला काय द्याच त्ये मागनं बगा पर आधी सायबाचं पाय धरा. बाकीचं सगळं माज्याकडं लागलं"२७

रेंजरसाहेब आणि फारेस्टच्या धाडीत धोंडीबाला कारण नसताना हजार रुपयांची लाच द्यावी लागते. खरे तर धोंडीबाने आपल्याच हद्दीतील आपल्याच मालकीची चार झाडे तोडलेली आहेत. पण विठ्ठल -संतोषी गणपागाडीवानाने पुन्हा निनावी अर्ज करून त्याच्यावर धाड घातली आहे. या धाडीत गावचा सरपंच सुद्दा सामील होतो. आणि लाच देवून धाड परतवतो, " मुंबिवालं, साहेब हजाराच्या आत करायला तयार न्हाय, काय करायचं बोला, माजं आतडं तुटत्या तुमच्यासाटनं, पर लई खवाट दिसत्या बाबा फारीष्ट........सरपंच, तालुक्याला कशयाला ? त्यास्नी वाडीतच जेवाय चला म्हनाव, आता पाचशो देवू.पास आनायच्या टायमाला पाचशो घ्या म्हनावं."२८

एखादे काम कुटुंबाला करता येणे शक्य नसले की ते काम " पावनेर " सांगून पार पाडले जाते. ही पावनेर सांगण्याची परंपरा ग्रामीण संस्कृतीचा अपरिहार्य घटक आहे. पावसाळा जवळ आला तरी शेताची नांगरणी पूर्ण झाली नसेल, किंवा मळणी करावयाची असेल किंवा इतर कोणतेही अशक्य काम असेल तेव्हा 'पावनेर' बोलवला जातो. या पावनेरात आपले पैपाहुणे दोस्त मंडळी येवून आपले काम करून देतात. त्याबद्दल श्रमपरिहार म्हणून एक जेवन त्यांना द्यावे लागते. या कादंबरीत तोडलेली झाडे कापून आणण्यासाठी आणि घरावरची कौले आणण्यासाठी पावणेर बोलावलेला दिसतो.

धोंडीबाची धाकटी बहीण आवडा हिचा नवरा दारूबाज असल्यामुळे आवडाचा होणारा छळ ग्रामीण जीवनदर्शनाचा एक भाग आहे. आवडानं पावनेरची नुस्ती आठवण करून दिली म्हणून तिचा नवरा तिला मारतो. मिलट्रीवाल्या भावाला घालवायला जाण्यासाठी परवानगी मागितली म्हणून काठीने फोडून काढतो.

शेवटी दुष्काळ पडल्यानंतर ग्रामीण लोकांची कशी वाताहत होते. दुष्काळी कामावर रोजंदारीने काम करावे लागते. भाकरीच्या पिठात कोंडा मिसळून केलेल्या भाकरी खाव्या लागतात. यांचे दर्शन घडते.

याशिवाय " सावली " या कादंबरीतील ग्रामीण जीवनदर्शनाचा भाग म्हणून श्रद्धा, अंधश्रद्धा आणि रुढींचाही भाग अभ्यासावा लागतो. कौल लावून पहाणे, लिंबू सुया टोचून दुस-यावर करणी करणे, आजारी मानसाला औषधाची अॅलर्जी झालीतर ती भूत बाधा समजणे, वास्तुक नाही, केले तर घरात भुताखेताना घुसण्यास वाव मिळतो, अशा प्रकारचे अनेक समज गैरसमज, श्रद्धा-अंधश्रद्धा प्रस्तुत कादंबरीत ग्रामीण जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणून येतात.

पाडव्याच्या सनाला गावसभा भरवून सामुदायिक लिंब खान्याची प्रथा, अमावस्येच्या दिवशी घरातील दागिना हालवूनये आणि सोमवती अमावस्येच्या आत वास्तुशांत करावी. अशा संकेताचे चित्रण कादंबरीत आले आहे.

अशा प्रकारचे जीवन चित्रण " सावली " या लघुकादंबरीत येताना दिसते. यामुळे पश्चिम कोल्हापूर प्रादेशिक पट्टयातील ग्रामीण जीवनाची कल्पना येते.

संघर्ष
---

" सावली " या कादंबरीत प्रामुख्याने तीन पातळीवरील संघर्ष येतात, १· व्यक्ती-व्यक्ती, २· व्यक्ती -परिस्थिती ३·कुटुंब-कुटुंब या पातळ्या होय· कादंबरीचे कथानक आपण पाहिले त्याचा सारांश " घर बांधताना येणाऱ्या अडचणी" इतकाच सांगता येईल· म्हणजे प्रस्तुत कादंबरी कथानक प्रधान नसून संघर्ष प्रधान आहे असे म्हणावे लागते·

कादंबरीतील घर बांधण्याला अनेकांचा विरोध आहे· अगदी कुटुंबातील व्यक्ती पासून भाउ बंदकीतल्या व्यक्ती पर्यंत· कादंबरीला मुंबईच्या गिरणी संपाची पार्श्वभूमी असल्यामुळे किंवा भ्रष्टाचारी सरकार तलाठी, कोतवाल , फॉरिस्टर, सरपंच आदी अधिकारी हे सुध्दा स्वार्थासाठी विरोध करताना दिसतात· हा विरोध कादंबरीत जागोजागी व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-परिस्थिती अशा स्वरूपातील संघर्षात प्रकट होताना दिसतो·

संपामुळे आलेल्या बेकारीत मुंबईतील खर्च झेपत नाही म्हणून नावा-वर असलेली सर्व पगाराची रक्कम घेवून धोंडीबा- दसरथा हे दोघेही आपल्या गावी परततात· त्यांच्या मनात घर बांधायचे आहे पण त्यांची आई म्हणते, " माज्या लुगड्यांच क्वतीक नकं सांगू आदी दसरताच्या लग्नाचं कसं करतोस बोल· मग मला कपान घाला न्हायतर तशीच मातीत गाडा" [२९] त्यावर धोंडीबा म्हणतो, " ही मामा दोगांची मिळगत संपातनं वाचूवून आन्लीया कशीबशी त्यात काय कराईच त्ये तूच ठरीव, त्येकाचं लगीन करु, न्हायतर घराचं काम काड· पर आवसंच्या येळंला वाईटवंगाळ बोलू नगं, आई" [३०] वरील संवादात आईला आपला मुलगा धोंडीबा याचे घर बांधणे अजिबात पसंत नाही· तिचा एकच हेका आहे तो म्हणजे दसरथाचे लग्न करण्याचा·

आईप्रमाणेच धोंडीबाच्या मावशीचाही घर बांधण्याला विरोध आहे कारण तिच्या लहान भावाची एक मुलगी लग्नाला आली होती. तिच्याशी दसरताचे लग्न व्हावे असे तिला वाटते. पन दसरथाला ती मुलगी करायची नाही कारण, " मामानी बहिणीचं आहेरमाहेर सरळ केल नव्हतं भाच्यांना कधी तांब्याभर पाणी माम्यांनी हावसनं दिलं नव्हतं"[११] असा हा धोंडीबा-दामू-दसरता विरुद्ध मावशी यांच्यातील कौटुंबिक संघर्ष आहे.

धोंडीबाचा तीन नंबरचा भाऊ नामा याचाही घर बांधण्यास विरोध आहे. कारण त्याला खेड्यातल्या घाणीत रहायचं नाही. त्याला कोल्हापूरला बंगला बांधायचा आहे. धोंडीबाचे घर बांधणे म्हणजे त्याला गावाची भर करण्यासारखे वाटते, म्हणून तो आपल्या पत्रातून स्पष्ट लिहितो, संपाच्या व्यापात ही तिसरी कटकट वाढवू नये. त्यापेक्षा दसरताच्या लग्नाचं बघावं,जुनं घर दुरुस्त करायचंही पुढं ढकलावं, नामा मिलकट्टीवाल्याचा पत्रातील हा उपदेश वाचून दामूला चीड येते, तो रागाने म्हणतो, " भनं भटाळल्यागत वागतया नेकटाट म्हंडल वाद्यावे-याचं कळविल्यावर तरी हयांला जरा चीड यील.हयो रड्या बंदूक आनून द्याचा आदार आमाला"[१२] पुढे तो जेव्हा प्रत्यक्षात घरी येतो तेव्हा संघर्षाला खरे तोंड फुटते. तार करून बोलावून घेतल्यामुळे नामा चिडला आहे. तो दाजीवर चिडतो, " रजा खाली दिस दिन भेटली भावजी, पन तारा कराय काय आक्कलभेजा हाय का न्हाय तुमास्नी"[१३] पुढं तो घराबद्दल भावांना दोष देत म्हणतो, " भना ही भसासा भर करत्यात सरपंच तलाठ्याची हयास्नी न्हाय दम तरी मी टपाल टाकलंत करून करत्यात काय, तर दगडामातीतंल खोपाट आनि वर माजंच माप काडत्यात ये घर हे का कोंडवाडा"[१४]

एका दृष्टीने पाहता नामा मिलकट्टीवाल्याचा संताप बरोबर आहे असे वाटते पण पुढे तो आपल्या भावांना न विचारताच पावनेर सांगतो. खरे तर पावनेर सांगण्यासाठी आगोदर येणा-यालोकांच्याकडून काम कोणते करवून घ्यायचे हे ठरवावे लागते. पावनेर वारंवार घालता येत नाही

एकदा किंवा दोनदाच तो बोलवता येतो. हा पावनेर भावाना न विचारता तो सांगतो त्यामुळे हा नामा अविचारीही असल्याचे दिसते. त्यावेळी धोंडीबा आणि त्याच्यात संघर्ष होतो. नामूच्या या आगावूपणाबद्दल धोंडीबा सरळ म्हणतो, " नामू, तुला आमच्या कामात ढवळाढवळ कराईचं कारन न्हाय.आता जग नाव ठेवील म्हणून तू ढवांग करतुयास. मग सरळ तू तरी कारबारी हू घरचा दाव घर बांधून."[१५]

वरील प्रकारचे व्यक्ती-व्यक्ती मधील संघर्ष या कादंबरीत येतात. या बरोबर व्यक्ती-परिस्थिती मधील संघर्ष सुद्धा या कादंबरीत काही ठिकाणी येतात.

धोंडीबाला सरकारी जमीनीत घर " दाबून बांदल्यात" म्हणून तलाठी कोतवाल लुबाडतात. एक हजार रुपयांची लाच उकळतात या प्रसंगात व्यक्ती विरुद्ध परिस्थिती असा संघर्ष दिसून येतो. कारण " तलाठी कोतवालाची धोंड" ही भ्रष्टाचाराचा आणि गणपा गाडीवानाच्या विघ्नसंतोषी वृत्तीचा परिणाम आहे.

गिरणी कामगारांनी पुकारलेला संप ही सामाजिक परिस्थितीची निदर्शक घटना आहे. या संपामुळे धोंडीबाला इचलकरंजीत कामाला जावे लागते. कोंडा मिसळलेली भाकरी खावी लागते. कर्जाचा हप्ता सुगीत भागवावयाचा असतो. पण दुष्काळ पडतो त्यामुळे सावकाराचे कर्ज भागवण्यासाठी शेताचा " कुणगा" विकण्याचा निर्णय घ्यावा लागतो. हा सर्व व्यक्ति विरुद्ध परिस्थितीच्या संघर्षाचा भाग आहे.

अशा या धावपळीत धोंडीबाला आजारपण येते. या आजारपणाला त्याला तोंड द्यावे लागते. अशा संघर्षामुळेच ही कादंबरी वाचनीय ठरते.

### सावलीची भाषा

" सावली " या कादंबरीतील भाषा अत्यंत समर्थ आणि संपन्न असल्याचे पदोपदी आढळते. या भाषेत चित्रात्मक शैली, क्वचित संवाद, ग्रामीण उपमा आणि ग्रामीण वाक्प्रचार, शब्द व म्हणी

यांचा औचित्याने वापर केल्याचे आढळते. कादंबरीच्या आशयाला पुरेपूर न्याय देणारी अशीच भाषा लेखकांनी आपल्या दोन्ही कादंब-यांसाठी वापरली आहे. " सावली " या लघुकादंबरीत घडत जाणा-या घटना या घटना ज्यांच्या मुळे घडतात ती पात्रे त्यांचे स्वभाव, जिथे ही कादंबरी घडते तो प्रादेशिक पट्टा तेथील नैसर्गिक स्थिती, गावांची वर्णने, जीवनदर्शन, श्रध्दा-अंधश्रध्दा, रुढी या सर्वांना अभिव्यक्त करु शकणारी समर्थ भाषा " सावली " या कादंबरीला लाभली आहे.

ही कादंबरी कोल्हापूर जिल्हातील पन्हाळा तालुक्याच्या प्रादेशिक पट्टयात घडते. हा पन्हाळा तालुका डोंगराळ असल्याने आणि विकासाच्या योजना पोहोचल्या नसल्याने मागास आहे. अशा गावांची तपशीलवार वर्णने या कादंबरीत येतात उदा." आता गाडी भोकरओढा ओलांडून चढाला लागली. समोरच्या टेकाला तीन-साडेतीनशे घरांची शिनोली दिसू लागली. दीड-दोन हजार वस्तीचं हे गाव. ते सहयाद्रीच्या विशाळगड फाटयाच्या पायथ्याला खडकातल्या बेळकीगत मुस्त बसलं होतं एकांडवाडी, खोताची वाडी, बोंगवाडी धनगरवाडा हा याच गावचा योलइस्तार, शिनोलीच्या उत्तरेला उतारावर दानोळी. या भागात म्हणाच पडली होती. " कामानं कण्हती शिणोली, आयतं गिळती दानोळी. . दानोळीकर कधी काळी दौडागाईत वाटमारी करीत शिनोली अजून फारसं सुधारलेलं गाव नव्हतं"[१६] अशा प्रकारे या कादंबरीत गावांची तपशीलवार वर्णने येतात. या शिवाय गावाच्या निसर्गाचे तपशीलवार चित्र स्पष्ट करणारी वर्णने सुध्दा येतात. एकांडवाडीच्या भोवतालची नैसर्गिक परिस्थिती स्पष्ट करताना लेखक लिहितो," वाडीची उगवतीची टेकडी दहाच्या आकडवाल्या नागाच्या फणीगतच होती. मावळतीला नरटुंगीचा कडा थेट पांडव-द-याला भिडला होता. दक्षिणेला पालथ्या नाळकागत नससाळीचा सुळका थेट आभाळाला भिडला होता तिच्या वरच्या टोकाला किर्रर्र जंगलाचा खोल दरीचा, भीतीनं छातीत धडकी भराय लावणारा पांडवदरा...

घालच्या खबदाडात बेल्टयाच्या तळाला उरल्यात्या थेंबागत एकांड-वाडीतील घरं दिस्त होती· नागफणी नि नरटुंगीच्या बेचक्यात बसलेल्या एकांड्वाडीचा पत्ता चोर-फरा-याला घावायाचा नाही· वारंवादळ तिला झोडपायचं नाही, सूर्यनारायन तिला करपायचा नाही, आंबा, जांबळ, हिरडा, सागाच्या झाडांनी वेढलेल्या वाडीची राखण कराय शंकरानं गळ्यातला नागच फणा काढून बसवलाय· पांडवदऱ्यातल्या भैरीच्या देवळातील घाट सिंग्या पुजाऱ्यानं दिसातनं एकदा वाजवली की वाघरू देखील वाडीत वासावर फिरकणार नाही· दुष्काळानं जग पाणीपाणी कराय लागलं तरी जांभ्या झऱ्याचा पाझर हटायचा नाही· असा एकांड्वाडीचा अभिमान होता."[३७]

अशा या निसर्गरम्य गावाच्या पार्श्वभूमीवर लेखक ऋतुचक्राचे दिनमान नमूद करतो· कळक उन्हाळ्यातील सूर्यास्ताचे वर्णन करताना लेखक म्हणतो, " दिवस नरटुंगीवर उस टेकाय निघाला होता"[३८] किंवा सकाळचे वर्णन करताना तो म्हणतो, " आता दिसाचा गोळा डोंगराच्या टकुरीवर टोपीवरच्या गोंड्यागत फिरत होता· कवळं उन थेट तोंडावर लागत होतं"[३९] पुढे उन्हाळा संपून पावसाळा जवळ येत आहे हे सुचवताना लेखक लिहितो, " कापसांचं वावर वाऱ्यानं हलल्यागत पांढरकं ढग उगवतीला उटत होतं· मावळतीला दिवस बुडाय चालला होता."[४०] अशा प्रकारची वर्णने कादंबरीत मधे-मधे येताना दिसतात या वर्णनामुळे वातावरण निर्मितीला खूप मदत झालेली आहे·

निसर्गातील वर्णनात जसा तपशील येतो तसा तो व्यक्तींच्या वर्णनातही येतो· उदा- धोंडीबा मुंबईहून गावी परतताना आपल्या मावशीकडे जातो तेव्हा मावशीच्या कृतीचा तपशील पहा:-

" मावशीनं पटापटा चार नवऱ्या मुलींच्या गोष्टी सांगितल्या मावशी बोलत बोलत चहा चुलीवर ठेवाय उठाय लागली·धोंडीबानं शनिवारचा उपास असल्याचं सांगितलं· मावशीनं गडबडीनं गूळशेंगांची तजवीज केली· ती दसरताच्या लग्नाविषयी कळकळीनं बोलत होती····

मावशीची समजू घालून धोंडीबा दाराकड वळला मावशीनं धाईन उठून उरल्याल्या शेंगा त्यांच्या पटक्याच्या शेवात बांधल्या दामूसाठी म्हणून"[४१] वरील अधोरेखित मजकुरात तपशील आढळतो

तसेच पंचायत भरली असताना आपला निर्णय सांगताना वाडीचा सरपंच सिदू पवार कसा बोलतो हे तपशीलवारपणे सांगितले आहे." सगळी बेठक चिडीचूप झाली, समदीजणं सिदूदाच्या तोंडाकडे बघाया लागली घोंगड्याच्या दशा खेळवीत तो खालमानेन दमानं बोलला..."[४२]

वास्तववादी कादंबरीसाठी असा तपशील आवश्यक ठरतो. साठोत्तर मराठी कादंबरीचे हेच एक महत्त्वाचे वैशिष्टय असलेले दिसते. " कागूद" " सावली " या दोन लघुकादंब-याच्या निमित्ताने १९७५ नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीने वास्तववादाचा पुढचा टप्पा गाठला आहे. वास्तव वातावरण निर्मितीसाठी कादंबरीत तपशीलवार वर्णने यावी लागतात तशी ती सावली मध्ये आलेली दिसतात.

पात्राचे उच्चार आणि लेखनातील सूक्ष्म तपशील लेखकांनी टिपले आहेत. " सावली " या कादंबरीत दोन-तीन ठिकाणी जे पत्र लेखन आलेले आहे त्यांचा आणि काही पात्राच्या संवादांचा अभ्यास करता हे सहज स्पष्ट होते.

नामा मिलट्रिवाल्याने मिलट्रीतून जे पत्र पाठवले आहे, " मला उत्तर पाठवायला टैम झाला नाय माफ करा.... दाजीच्या तालावर नाचणं मला बिल्कूल पसंत नाही.....स्पष्ट विचारलं म्हणून खुल्लम-खुल्ला कळीवलंय"[४३] या पत्रात टैम, बिल्कूल, नाय, खुल्लम-खुल्ला असे इंग्रजी, हिंदी शहरीमराठीचे शब्द येतात. मिलट्रीवाल्याचे प्रत्यक्ष बोलणे ही असेच आहे. " रजा खाली दस दिन भेटली, भावजी पण तारा कराय काय आक्कल भेजा हाय का न्हाय तुमास्नी"[४४] या त्याच्या उद्गारावरून अगदी स्पष्ट होते की तो खरोखरच मिलट्रीत आहे. कारण मिलिट्रीत नोकरी करणा-या मराठी भाषिकांची मराठी अशीच बदललेली दिसते.

आता धोंडीबाच्या संवादातील बारकाव्याने टिपलेला तपशील पहा:-
" दसरताचं शेंगासेलाचं साततेू नि तुमच्या बेलाचं तेराशे"[४५] या उद्‌गारातील बारकावा पहा वरील वाक्यात शेकड्यातील शे दोन वेळा आला आहे. पण पहिल्या ठिकाणी तो " से " असा येतो तर दुसऱ्या ठिकाणी " शे" असा व्यवस्थित उच्चार येतो. पहिल्या " से " चा विचार करता " सातसे " या शब्दात पहिले अक्षर " सा" येत असल्याने शेवटच्या अक्षराच्या ठिकाणी " शे " च्या ऐवजी से येते. धोंडीबाला तेथे " सा " वरुन " शे " वर जीभ वळवता येत नाही. किंबहुना कोणत्याही ग्रामस्थाची अशीच अवस्था होते. हा बारकावा लेखकाने अत्यंत अचूकपणे टिपला आहे.

धोंडीबाला मुंबईहून आलेल्या तुकारामाच्या पत्रातील एक उल्लेखसुद्धा अभ्यसनीय आहे. या पत्रात मायन्यामध्ये पहा-

" प्रिय धोंडीराम भौर यांसी,

" तुकारामचा सा.न.वि.वि.राऊत मिस्त्रींचा आशिर्वाद
" आमच्या नि तुज्या घरची खुशाली कळीव. चिठ्ठी लिहिणाऱ्या राऊत मिस्त्रीचा आपना सर्वांना मानाप्रमाणे नमस्कार"[४६] मिस्त्री पत्र लिहिणारा आहे. त्यामुळे त्याचा उल्लेख येणे अटळच ठरते.

याशिवाय " सावली " या कादंबरीच्या भाषेचा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे या भाषेत वाक्‌प्रचार, म्हणी, आणि ग्रामीण शब्द याची भरपूर प्रमाणात असलेली रेचलेल. सावलीची भाषा अस्सल ग्रामीण शब्दामुळे या कादंबरीत, वाचीक, हुलीव घालणे, कारबारी, यॅंगाटली, मळ्याचोळ्या, आयरमीटीला, व्हगला व्हगली, हारहरकत, टीकाव शेवटाय, घायपात, सूस, झिटालला, दुचमाटली, नामना, सुनभेर कटनान -हायचं, भेबळून गेलो, हेबळा हेबळी, झनपन, आऱ्या चाप लावला, दास्तानी...........

बेळ्यातंन, हुदाबिदाकला तर, पल्स, हाबडं,पेरंकरी, डोळमोड्वान, चिरकांडीला, झटीलमनश्, काळा म्हाळाला, कता-या, उल्पा, पेरणीच्या वैटयात, इंती, भिंती वार सोडल्या, द्वासन्या तोडाय, इवूद, बंदवा, गिडबाक,तळ्ज, हाडांचा पांगारा,....इत्यादी अनेक अपरिचित ग्रामीण शब्द येथे येतात.

ग्रामीण शब्दा बरोबर काही गमतीशीर अशा अस्सल ग्रामीण म्हणी आणि वाक्प्रचार या कादंबरीत जागोजाग येतात,

म्हणी

१. कामान कन्हती शिणोली,आयतं गिळती दानोळी
२. वाडीत -हानं ती बेल्यात खानं
३. सरकारी खटलं नि टकूरं उटलं
४. पावन्याचा उपकार नि नात्याला अपकार
५. येड्यांचा बाजार नि बत्ताशांचा पाऊस

वाक्प्रचार

१. भोर त्ये भोर नि मला म्हणा मोर
२. मिशा गुड्ध्यावर लोंबाय लागल्या
३. मनं भटाळल्यागत वागतया ते बळाच
४. मो रात जावून केरात जाणार
५. हाडाला कातड चिकाटलं
६. ओतानं रान वजवीत होता.
७. आमची हाडं उगळीत नि तुमी दाताचं पानी गिळीत

वरीलप्रकारे सावली या कादंबरीची भाषा अत्यंत समृध्द आहे.

समारोप

अशा प्रकारे आपण " सावली " या आनंद पाटील यांच्या दुस-या लघुकादंबरीचा अभ्यास केला त्यामध्ये कथानक ही बाब अत्यंत गौण असलेली

दिसून येते. या कादंबरीतील व्यक्तिरेखा, संघर्ष आणि चित्रित होणारे ग्रामीण जीवनाचे स्वरूप आपण पाहिले. या सर्व घटकांचा समन्वय साधणारी आनंद पाटील यांची भाषा अत्यंत लवचिक आहे. या भाषेचे विशेष कोणते हे ही आपण पाहिले

आनंद पाटील यांच्या दोन कादंबऱ्यानंतर आता पुरुषोत्तम बोरकर यांच्या 'मेड इन इंडिया' या कादंबरीचा सांगोपांग अभ्यास पाहू.

संदर्भ

१· पाटील,आनंद : कागूद " आणि " सावली ."
मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती पहिली १९८६ पृ· ७०.

२· तत्रैव पृ· ७०

३· तत्रैव पृ·७९

४· तत्रैव पृ· ७९

५· तत्रैव पृ·८३

६· तत्रैव पृ· ८१

७· तत्रैव पृ·९०

८· तत्रैव पृ· ९४

९· तत्रैव पृ·१३३, १३४

१०· तत्रैव पृ· १०७, १०८

११· तत्रैव पृ· १२७

१२· तत्रैव पृ·१४४

१३· तत्रैव पृ·७८

१४· तत्रैव पृ· ६२

१५· तत्रैव पृ· ७४

१६· तत्रैव पृ· ७३

१७· तत्रैव पृ· ६९

१८· तत्रैव पृ· १०३

१९· तत्रैव पृ· १०२

२०· तत्रैव पृ· १०७

२१· तत्रैव पृ· १२२

२२· तत्रैव पृ· ११७

२३· तत्रैव पृ·७८

२४· तत्रैव पृ· १२०

२५· तत्रैव पृ·६४, ६५

२६. तत्रैव पृ. ८०

२७. तत्रैव पृ. ८९

२८. तत्रैव पृ. १३१

२९. तत्रैव पृ. ६९

३०. तत्रैव पृ. ६९

३१. तत्रैव पृ. ७७

३२. तत्रैव पृ. ७८

३३. तत्रैव पृ. १०३

३४. तत्रैव पृ. १०३

३५. तत्रैव पृ. १११

३६. तत्रैव पृ. ६५

३७. तत्रैव पृ. ६७, ६८.

३८. तत्रैव पृ. १२०

३९. तत्रैव पृ. ६३

४०. तत्रैव पृ. १२३

४१. तत्रैव पृ. ६७

४२. तत्रैव पृ. ९९

४३. तत्रैव पृ. ७८

४४. तत्रैव पृ. १०३

४५. तत्रैव पृ. १०४

४६. तत्रैव पृ. १२५